# मुंबई विद्यापीठ

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी परिसर,
सांताक्रूझ (पूर्व) मुंबई - ४०००९८.
Email - dboee@exam.mu.ac.in

---

क्र. DBOEE/ICF/2024-25/1261 दिनांक. 14 फेब्रुवारी 2025

## परिपत्रक

**संदर्भ :** 1) **DBOEE /ICF /2024 -25 /1256, दिनांक 31.01.2025**
2) **DBOEE /ICF /2024 -25 /1259, दिनांक 10.02.2025**
3) **DBOEE /ICF /2024 -25 /08, दिनांक 30.10.2024**
4) **DBOEE /ICF /2023 -24 /25, दिनांक 07.04.2023**
5) **DBOEE /ICF /2022 -23 /14, दिनांक 21.10.2022**
6) **DBOEE /ICF /2024 -25 /144, दिनांक 31.12.2024**
7) **गुण व प्रमाणपत्र /४८५ /२०२५ दिनांक 01.02.2025**
8) **DBOEE /ICF /2024 -25 /1260, दिनांक 15.02.2025**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख / संचालक, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थांचे संचालक ( सर्व विद्याशाखा ) यांना कळविण्यात येते कि, उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्रमांक १ महाविद्यालयांना NEP पदवी ( सत्र १ ) अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे मूल्यांकन करून, त्या परीक्षांच्या Theory / Practical/ Internal etc. परीक्षांचे गुण (marks) दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत ई समर्थ (E-Samarth ) पोर्टलद्वारे विद्यापीठाकडे सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु १० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत अत्यल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे ई समर्थ (E-Samarth ) पोर्टलद्वारे गुण (marks) सादर करण्याची मुदत वाढवून, दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ करण्यात आली होती. तरी अद्याप बहुसंख्य विद्यार्थीचे गुण महाविद्यल्यांकडून ई समर्थ (E-Samarth) पोर्टलद्वारे सादर करण्याची प्रकीया प्रलंबित असल्यामुळे संदर्भ क्र. ८ नुसार, गुण सादर करण्यसाठी दिनांक 20 फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. गुण सादर करण्याची ही अंतिम मुदतवाढ आहे, यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व महाविद्यालयांनी जबाबदारि पूर्वक नोंद घ्यावी. यानंतरही महाविद्यालयांकडून गुणांची नोंद पोर्टलवर झाली नाही याकारणास्तव विद्यार्थ्यांचे निकाल राखीव राहिल्यास त्यासाठी महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहतील.

तसेच, संदर्भीय परिपत्रक क्रमांक ३, ४, ५ व ६ नुसार विद्यार्थीचे ABC ID सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे व संदर्भीय परिपत्रक कमांक ७ नुसार महाविद्यालयांनी आपल्याकडे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीचे MKCL पोर्टलवर आडनाव, विद्यार्थीचे नाव, वडिलांचे नाव व आईचे नाव या क्रमानुसार मराठी (देवनागरी लिपीत ) अचूकपणे खात्रीपूर्वक नमूद करावे या बाबत कळविण्यात आलेले आहे. परंतु, असे

निदर्शनास आले आहे की काही महाविद्यालयांनी दिलेल्या सूचनांची योग्य दखल घेतलेली नाही आणि नियमांचे पालन केलेले नाही.

महाविद्यालयांना वारंवार सूचना देण्यात आल्या असूनही, उपरोक्त परिपत्रकातील माहिती अद्याप विद्यापीठाकडे पूर्णपणे सादर झालेली नाही. ABC ID प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी UGC नियमानुसार अनिवार्य आहे, तरीही महाविद्यालयांकडून अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे. ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे.

वरील मुद्द्यांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यासाठी **गुरुवार, दिनांक 20 फेब्रुवारी 2024 रोजी दुपारी 4:00 वाजता ऑनलाईन बैठकीचे आयोजन** करण्यात आले आहे.

बैठकीस उपस्थित राहण्याबाबत सूचना:

1. महाविद्यालयांच्या प्राचार्यांची उपस्थिती अनिवार्य आहे.
2. बैठकीसाठी ऑनलाईन लॉगिन करताना खालील माहिती नमूद करणे आवश्यक आहे:
   - कॉलेजचे नाव
   - प्राचार्यांचे नाव
   - महाविद्यालयाचा कोड
3. महाविद्यालयांच्या प्राचार्यांना असे वाटत असेल की इतर प्राध्यापक किंवा शिक्षकेतर कर्मचारी देखील उपस्थित राहावेत, तर त्यांनी एकाच लॉगिन मध्ये सोबत इतरांना बैठकीस उपस्थित राहण्यासाठी संधी उपलब्ध करून द्यावी.
4. यासाठी महाविद्यालयाने कॉन्फरन्स हॉल किंवा स्वतंत्र खोलीत बैठकीसाठी योग्य व्यवस्था करावी.
5. प्रत्येकाने दुपारी ३.३० वाजताच बैठकीसाठी Login करावे.

तरी, सर्व संबंधित महाविद्यालयांनी या बैठकीत उपस्थित राहून विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन कराणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी.

Login id and password for meeting as below:

https://us06web.zoom.us/j/89614234181?pwd=aCmr8hryf8ku8EDhbSbX0kF0zuiNbg.1

Meeting ID: 896 1423 4181
Passcode: 092325

**(डॉ. पुजा रौंदळे)**
**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रती:**

मुंबई विद्यापीठाची संलग्नित सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, पदवी आणि पदव्युत्तर महाविद्यालयांचे प्राचार्य व संस्थांचे संचालक.

**प्रत माहितीस्तव :**

१) प्रभारी संचालक, DICT २) उपकुलसचिव, प्रवेश नोंदणी व पात्रता विभाग ३) उपकुलसचिव गुण व प्रमाणपत्र विभाग ४) उपकुलसचिव, निकाल कक्ष.

२) स्वीय साहयक - १) कुलगुरू २) प्र-कुलगुरू ३) कुलसचिव.